| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार**<br>**यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |


**प्रेसनोट क्रमांक :- ३०८** **दिनांक :-०३/११/२०२१**

## दिवाळी सणानिमित्त फटाक्यांच्या वापराबाबता सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश जारी

दिवाळी सणाचे कालावधीमध्ये फटाक्यांची खरेदी, विक्री व फटाक्यांचा वापर याबाबात मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२९/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने सरसकट फटाक्यांना बंदी नसलेबाबत स्पष्ट केले आहे. तथापि रसायने वापरुन तयार केलेले बंदी असलेल्या फटाक्यांची विक्री व वापरास मनाई केलेली आहे. बनावट ग्रीन फटाके विकणाऱ्या सर्व उत्पादकांचे परवाने निलंबित करण्यात येतील. हरित फटाक्यांचा वापर करुण प्रदुषण कमी करुन पर्यावरणाची हानी टाळण्याबाबत निर्देशित केले आहे. फटाक्यांच्या माळींची लगड विक्री व वापराकरीता मनाई आहे. ई कॉमर्स संकेतस्थळांना फटाके विक्री करण्यास मनाई आहे तसेच बेरियम सॉल्ट मिश्रीत फटाके विक्री करण्यास व वापरण्यास मनाई आहे. दिवाळी उत्सवा दरम्यान रात्री ०८.०० ते १०.०० वाजेदरम्यान बंधनकारक आहे. नागरिकांचे विशेषः जेष्ठ नागरिक व लहान मुले यांच्या आरोग्यास अपायकारक असलेल्या फटाक्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातलेली आहे. सदरचे निर्देशाचे अनुपालन काटेकोरपणे व्हावे याकरीता मिरा-भाईदंर, वसई -विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रात फटाक्यांची विक्री व वापराबाबत नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

-------ooooo---------